# QUICK NEWS

## मॉयलला फाईव्ह स्टार रेटिंग अवॉर्ड




**नागपूर.** मॅग्निज ओर इंडिया लि. (मॉयल) ला सस्टेनेबल डेव्हलपमेंट फ्रेमवर्क (एसडीएफ) करिता 5 स्टार रेटिंग अवॉर्ड प्रदान करण्यात आला. खनन मंत्रालयद्वारा दिल्लीत आयोजित कॉन्क्लेव्हमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आला. मॉयलला हा पुरस्कार कांद्री, चिखली, डोंगरीबुजुर्ग, गुमगाव आणि मनसर माईन्सकरिता देण्यात आला. अध्यक्ष तसेच व्यवस्थापकीय संचालक एम. पी. चौधरी, संचालक पी.वी.वी. पटनाइक, राजेश भट्टाचार्य यांनी केंद्रीय कोळसा व खाण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडून पुरस्कार प्राप्त केला. 5 स्टार रेटिंग मिळाल्याने केवळ महत्त्वच वाढले नाही तर यामुळे विविध स्टेक होल्डर्सचाही कंपनीप्रति विश्वास वाढेल.